RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १६(२)] मंगळवार, जून १६, २०२६/ज्येष्ठ २६, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**—महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.. .. .. .. .. .. | **पृष्ठे** **१–३** |

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2026.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि, ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; १९६२ चा महा. ३.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याच्या कलम २२ मध्ये, पोट-कलम (२) मधील, “पंचाहत्तर कोटी रुपये” या मजकुराऐवजी, “सहा हजार कोटी रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा. ३.

## निवेदन

महाराष्ट्र राज्यातील, औद्योगिक क्षेत्रांत व औद्योगिक वसाहतींत उद्योगधंद्यांची पद्धतशीर स्थापना करण्यासाठी विशिष्ट तरतूद करणे, आणि सामान्यतः त्यांचे संघटन करण्यास साहाय्य देणे व त्या प्रयोजनासाठी औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करणे, आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम २२ मध्ये अशी तरतूद केली आहे की, महामंडळास, पुरेशा प्रमाणात द्रव्य साधनांची स्वतःसाठी तरतूद करण्याच्या हेतूने खुल्या बाजारातून किंवा कोणत्याही बँकांकडून किंवा वित्तीय संस्थांकडून, पैसे कर्जाऊ घेता येतील. उक्त कलम २२ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, महामंडळास, कोणत्याही वेळी कर्जाऊ घेता येईल अशी कमाल रक्कम, पंचाहत्तर कोटी रुपये असेल. सन १९७५ पासून, पन्नास वर्षांपेक्षा अधिक वर्षे, उक्त कर्जाची कमाल रक्कम वाढविण्यात आलेली नाही.

**३.** महामंडळ, राज्यातील औद्योगिक विकासासाठी औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक प्रक्षेत्रे आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा विकास हाती घेते. राज्यातील वाढत्या औद्योगिक गुंतवणुकीकरिता महामंडळास नवीन औद्योगिक प्रकल्प व पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी अतिरिक्त वित्तीय साधनसंपत्तीची आवश्यकता आहे. अशा औद्योगिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनीचे संपादन करणे देखील आवश्यक असते आणि त्यासाठी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) मधील तरतुदींनुसार जमीनमालकांना मोठ्या प्रमाणात नुकसानभरपाईची अनुषंगिक रक्कम प्रदान करणे आवश्यक ठरते.

वरील बाबी विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (२) मध्ये सुधारणा करून महामंडळास कर्ज घेता येईल त्या रकमेची कमाल मर्यादा, पंचाहत्तर कोटी रुपयांवरून सहा हजार कोटी रुपये इतकी वाढविणे इष्ट आहे, असे वाटते.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा, अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १६ जून २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. पी. अन्‌बलगन,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.